# रे.दि.मु.नं. ५५८/२०१७ मधील नि.३१ खालील आदेश

(संभाजी हरीबा बुरुंगुले वि. विलास नामू घुटूकडे-५)
CNR No.MHSO20-002201-2017

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी मयत प्रतिवादी क्र.२ ईश्वरा नामु घुटूकडे यांचेविरुध्दचा 'अबेट' चा हुकूम रद्द होवून मिळणेसाठी केलेला आहे. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.२ ईश्वरा नामु घुटूकडे हे दि.०३/०५/२०२१ रोजी मयत झाले आहे. प्रतिवादी मयत असलेबाबत त्यांचा मृत्यू दाखला निशाणी ३६ कडे दाखल केले आहे. वादी हे आजारी असलेमुळे व इंडोप्लॅस्टीक बाय पास सर्जरी झाल्याकारणाने सदर मयताचे वारस रेकॉर्डवर मुदतीत आणता आले नाहीत. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.२ विरुध्द सदरचा दावा अबेट झाला आहे. वादीने सदरचे अर्जाद्वारे मयत प्रतिवादी क्र.२ ईश्वरा नामु घुटूकडे यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द होऊन मिळण्याची विनंती केली आहे.

२. सदर अर्जास प्रतिवादीतर्फे दिलेल्या म्हणणे मध्ये त्यांनी वादी यांना दंड करण्याचा अटीवर मंजूर करण्यास नाहरकत दर्शविले.

३. सदरच्या अर्जावर दोन्ही पक्षातर्फे वकिलांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीची मोजणी होवुन हद्दीखुणा कायम होवुन मिळणेचा व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. त्यासाठी मयत प्रतिवादी क्र.२ ईश्वरा यांचे बाबत अबेटचा आदेश रद्द होणे आवश्यक आहे. दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषांवर निर्गत होणे आवश्यक आहे. तसेच

अर्जात नमूद केलेले कारण पाहता वादीस मयत प्रतिवादी क्र.२ यांचे विरुध्द झालेला अबेटचा आदेश रद्द करुन घेण्यास झालेला विलंबासाठी खर्चाचा आदेश करणे योग्य होणार नाही. सबब, खालील आदेश करण्यात येते.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज (नि.३१) मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी ईश्वरा नामु घुटूकडे यांचे विरुध्द झालेला अबेंटमेंट आदेश रद्द करण्यात येतो व दावा पुनर्जिवीत करण्यात येतो.

BHAGYASHRI MADHUKAR POTDAR

Digitally signed by BHAGYASHRI MADHUKAR POTDAR
Date: 2022.06.27 12:09:50 +0530

सांगोला. (सौ. बी. मधुकर पोतदार)

दिनांक: २४/०६/२०२२. दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, सांगोला

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. S. S. Patne |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar,<br>$2^{nd}$ Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 24.06.2022 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 27.06.2022 |